ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-I, Issue-V February 2013

# आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्व विकासासाठी राबविलेल्या उपक्रमांच्या परिणामकारकतेचा अभ्यास

डॉ. खुशाल लिंबराज मुढे
प्राचार्य, कामधेनू कॉलेज ऑफ एज्युकेशन,
जाटवाडा रोड, औरंगाबाद
व
प्रा. सुरेंद्र चंद्रकांत हेरकळ
माईर्स, एम.आय.टी. स्कूल ऑफ एज्युकेशन,
कोथरूड, पुणे – 38

***सारांश :***

*स्पर्धेच्या युगात दुर्गम भागातील भटक्या जाती–जमातीतील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळून त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी जाणीवजागृतीपर उपक्रमांव्दारे बदल घडविणे शक्य आहे का ? या संशोधन प्रश्नांतून विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्व विकासासाठी संशोधन करण्यात आले आहे.*

**मुख्य संज्ञा : व्यक्तिमत्व विकास व राबविलेले उपक्रम.**

**प्रस्तावना :**

आदिवासी तसेच दुर्गम भागातील भटक्या जाती – जमातीतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीसाठी प्रामुख्याने आश्रमशाळांची निर्मिती करण्यात आली. सन 1972 पासून राज्यात शासकीय आश्रमशाळांची योजना राज्यात कार्यान्वित करण्यात आली. दिवसेंदिवस शासनधोरणामुळे व शिक्षण हक्क कायदयाने आश्रमशाळांच्या संख्येत वाढ होत आहे. सद्यस्थितीत पश्चिम महाराष्ट्रात पंचवीसहून अधिक आश्रमशाळा आहेत. तर जुन्नर तालुक्यात आश्रमशाळांची संख्या 12 एवढी आहे.

सन 1964–66 च्या कोठारी आयोगाच्या शिफारशीप्रमाणे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी नागरिकांच्या सक्षमीकरणासाठी व शिक्षण मिळण्यासाठी आश्रमशाळांची निर्मिती करण्यात यावी असे सुचविले होते. त्याचप्रमाणे महाराष्ट्राखेरीज ओरिसा, गुजरात, केरळ, तामिळनाडू, राज्यस्थान व हिमाचल प्रदेश या राज्यात सन 1993 रोजी आश्रमशाळांची संख्या 600 होती.

आजच्या स्पर्धेच्या युगात दुर्गम भागातील भटक्या जाती–जमातीतील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळून

त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी जाणीवजागृतीपर उपक्रमांव्दारे बदल घडविणे शक्य आहे का ? या संशोधन प्रश्नांतून विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्व विकासासाठी आवश्यक अंग म्हणून बहिमुखता, मनोविक्षिप्ती, चेतापदशीता, लाय स्कोर या घटकांच्या विकासासाठी उपक्रम राबविण्याकडे लक्ष केंद्रीत केले.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1. आदिवासी आश्रमशाळेतील व्यक्तिमत्त्व विकास न झालेल्या विद्यार्थीनींचा शोध घेणे.
2. आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थीनींच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी उपक्रम राबविणे.
3. आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थीनींच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी राबविलेल्या उपक्रमांची परिणामकारकता अभ्यासणे.

**संशोधनाची गृहितके :**

1. आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थीनींचा पुरेशा प्रमाणात व्यक्तिमत्त्वाचा विकास झालेला नसतो.
2. व्यक्तिमत्त्व विकास नसल्यामुळे त्यांच्या भावी जीवनावर दूरगामी परीणाम होतात.
3. उपक्रमांव्दारे व्यक्तिमत्त्व विकास घडवून आणणे शक्य आहे.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :**

1. प्रस्तुत संशोधनात व्यक्तिमत्त्व विकासातील बहिमुखता, मनोविक्षिप्ती, चेतापदशीता, लाय स्कोर याच घटकांशी संबंधित आहे.
2. प्रस्तुत संशोधन हे माध्यमिक स्तरातील इयत्ता नववी या वर्गापुरतेच मर्यादीत आहे.
3. प्रस्तुत संशोधन हे विद्यार्थीनींच्या व्यक्तिमत्त्वाशी संबंधित आहे.
4. प्रस्तुत संशोधन हे एका शाळेपुरतेच मर्यादित आहे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधन विद्यार्थीनींच्या व्यक्तिमत्व विकासासाठी राबविलेल्या उपक्रमांच्या परिणामकारकतेचा अभ्यास या विषयी असल्यामुळे प्रायोगिक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला.

**न्यादर्श :**

सदर संशोधनासाठी जुन्नर तालुक्यातील शासकीय कन्या आश्रमशाळा, सोमतवाडी ही शाळा सहेतुक पध्दतीने निवडली. तसेच आयझेंक व्यक्तिमत्व विकास मापन चाचणीव्दारे सर्वात कमी अंक

असलेल्या 20 विद्यार्थीनींचा निवड करण्यात आली.

**माहिती संकलनाची साधने :**

आयझेंक व्यक्तिमत्व विकास मापन शोधिका.

**संशोधनाची कार्यपध्दती :**

प्रस्तुत संशोधनामध्ये पुणे जिल्हयातील जुन्नर तालुक्यातील आदिवासी भागात कार्यरत असलेल्या शाळेची प्रायोगिक तत्वावर निवड करण्यात आली. या शाळेतील इयत्ता नववीच्या वर्गातील सर्व विद्यार्थीनींना आयझेंक व्यक्तिमत्व विकास मापन चाचणी देण्यात आली. चाचणीमध्ये 90 प्रष्नांचा समावेश होता. चाचणीतील बहिमुखता, मनोविक्षिप्ती, चेतापदशीता, लाय स्कोर या घटकांचा विचार करण्यात आला. या सर्व विद्यार्थीनीपैकी सर्वात कमी अंक प्राप्त 20 विद्यार्थीनीची प्रयोगासाठी निवड करण्यात आली. उपक्रम राबविताना या विद्यार्थीना व्यक्तिमत्व विकासाबाबत माहिती दिली. यशस्वी जीवनासाठी त्याचे महत्त्व स्पष्ट केले. व्यक्तिमत्व विकासासाठी उपलब्ध सी.डी.व्दारे तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित केली. डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम व स्वामी विवेकानंद यांसारख्या थोर पुरूषांच्या आत्मचरित्रांचे वाचन करण्यात आले. कबड्डी, खो–खो यासारख्या सांघिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. तसेच विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. योगासनांची शिबीरे घेण्यात आली.

संशोधनासाठी निवडलेल्या 20 विद्यार्थीनीना पुन्हा आयझेंक व्यक्तिमत्व विकास मापन चाचणी देण्यात आली. दोन्ही मापन चाचणीतील बहिमुखता, मनोविक्षिप्ती, चेतापदशीता, लाय स्कोर या घटकांमधील प्राप्तांकातील फरकाचा अभ्यास करण्यात आला आणि योग्य ते निष्कर्ष काढण्यात आले.

**संशोधनाचे निष्कर्ष :**

प्रस्तुत संशोधनाव्दारे खालील निष्कर्ष काढण्यात आले.

1. आदिवासी भागातील 90% विद्यार्थीनीमध्ये पूर्व चाचणीव्दारे बहिर्मुखतेचे प्रमाण प्रमाणित गुणांकापेक्षा कमी प्रमाणात आढळले. परंतू योग्य उपक्रमांव्दारे बहिर्मुखतेच्या प्रमाणित गुणांकापर्यंत 70% विद्यार्थींनी पोहचण्यात यशस्वी झाल्या.
2. आदिवासी भागातील 100% विद्यार्थीनीमध्ये पूर्व चाचणीव्दारे मनोविक्षिप्तीचे प्रमाण प्रमाणित गुणांकापेक्षा जास्त प्रमाणात आढळले. परंतू योग्य उपक्रमांव्दारे मनोविक्षिप्तीच्या प्रमाणित गुणांकापर्यंत 50% विद्यार्थीनी पोहचण्यात यशस्वी झाल्या.

3. आदिवासी भागातील 80% विद्यार्थीनीमध्ये पूर्व चाचणीव्दारे चेतापदशीताचे प्रमाण प्रमाणित गुणांकापेक्षा जास्त प्रमाणात आढळले. परंतू योग्य उपक्रमांव्दारे चेतापदशीताच्या प्रमाणित गुणांकापर्यंत 70% विद्यार्थीनी पोहचण्यात यशस्वी झाल्या.
4. आदिवासी भागातील 70% विद्यार्थीनीमध्ये पूर्व चाचणीव्दारे मनोविक्षिप्ती प्रमाण प्रमाणित गुणांकापेक्षा जास्त प्रमाणात आढळले. परंतू योग्य उपक्रमांव्दारे मनोविक्षिप्तीच्या प्रमाणित गुणांकापर्यंत 30% विद्यार्थीनी पोहचण्यात यशस्वी झाल्या.
5. आदिवासी व भटक्या जाती–जमातीतील विद्यार्थीनीचा व्यक्तिमत्व विकास प्रभावी उपक्रमांव्दारे करणे शक्य आहे.

**संशोधनातील शिफारशी :**

1. समाजातील जबाबदार घटकांनी अर्थात शाळा, स्थानिक प्रशासन, एन.जी.ओ., सेवाभावी वर्ग यांनी व्यक्तिमत्व विकासासाठी जनजागृतीचे उपक्रम हाती घ्यावे.
2. आदिवासी व भटक्या जाती – जमातीतील विद्यार्थ्यांसाठी प्राथमिक स्तरापासून व्यक्तिमत्व विकासकडे विशेष लक्ष दयावे.
3. शासनाने विशेष पुढाकार घेवून या लोकांच्या व्यक्तिमत्व विकास घडवून त्यांना सामाजिक दर्जा प्राप्त करून दयावा.

**संदर्भ सूची :**

1. आयझेंक व्यक्तिमत्व विकास मापन चाचणी.
2. पाटील, कां आणि गंगाधर, वि. (2006). शैक्षणिक मानसशास्त्र, नाशिक : चैतन्य प्रकाशन.
3. गोखले, हेमंत (2007). व्यक्तिमत्व विकासाचे सोपे मार्ग, पुणे : नूतन प्रकाशन.
4. संकपाळ, सुरेंद्र (2010). व्यक्तिमत्व विकास. शिक्षण संक्रमण. पुणे: म.रा.मा.व उ.मा.शि.मं.
5. जमादार, संगिता (2008). व्यक्तिमत्व विकासासाठी पोषक नेतृत्वा गुणांची पडताळणी, भारतीय शिक्षण. नागपूर.
6. Bhushan,L.I.(1968) Personality factors and leadership perference. (Ph.D.) Psy. Bhagalpur,U.P.
7. www.trans4mind.com/personlity/EPQ.html.
8. www.eysenkpersonlityinventry.com